MHST020092152023

**नियमीत दिवाणी दावा क्र.७०९/२०२३**

श्री. केतन तानाजी सुतार वगैरे .....वादी

विरुध्द

श्रीमती सुरेखा नेताजी सुतार वगैरे .... प्रतिवादी

**निशाणी क्र.६४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश VI नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांच्या म्हणण्यानुसार, वादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्याविरुद्ध दावा कलम २अ व २ब मिळकतींच्या वाटप, जाहीर ठराव व पृथक कब्जासाठी त्याचप्रमाणे मयत नेताजी तुकाराम सुतार यांचे मृत्यूपश्चात अनुकंपा तत्त्वावरील नोकरी हक्क व अन्य देयके वादी क्र.१ ला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दावा कलम ३ मध्ये वादी व प्रतिवादींची वंशावळ दिली आहे, मात्र सदर वंशावळीत तुकाराम भिकू सुतार यांची २ नंबरची पत्नी शांताबाई तुकाराम सुतार या मयत झाल्याचे अनावधानाने नमूद केले आहे. परंतु सदर शांताबाई या जिवंत आहेत. त्यांना दाव्याकामी प्रतिवादी क्र.८ म्हणून सामील करणे जरुरीचे आहे. त्याकरिता अर्जात नमूद प्रमाणे नि.क्र.१ मधील प्रतिवादी क्र.७ संपल्यानंतर अर्जात नमूद प्रमाणे प्रतिवादी क्र.८ यांचे नाव नमूद करावे तसेच कलम २अ मधील अनुक्रमांक ३ मिळकतीचा हिस्सा कॉलममध्ये संपूर्ण चुकीचे लिहिले आहे ते १/३ नमूद करण्यास परवानगी असावी, त्याचप्रमाणे दावा कलम ७ मध्ये दिनांक ०९.०६.२०२० ऐवजी ०९.०६.२०१० असे नमूद करण्यास परवानगी

असावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे. तसेच दावा कलम २ब नंतर अर्जात नमूद प्रमाणे २क मजकूर समाविष्ट करण्यास परवानगी असावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. दावा कलम १० मध्ये पेन्शनमधील प्रतिवादी क्र.१ ला अदा केलेल्या रकमेतील १/४ हिस्सा म्हणजे ९,१२,७०६.२५/- वादी क्र.१ ला मिळण्याकरिता यावरील र.रु. २२,८३०/- चा कोर्ट फी स्टॅम्प देण्यास वादी तयार आहे. वादीने प्रस्तुत दाव्यात त्यांचा व साक्षीदारांचा सरतपास व उलटतपास हजर केलेला आहे. तथापी दुरुस्ती अर्ज कलम २क मधील माहिती व कागदपत्रे वादीस नुकतीच प्राप्त झाल्याने सदरची वादी क्र.१ च्या न्याय हक्काची दुरुस्ती करणे गरजेचे व आवश्यक आहे. म्हणून सदरची दुरुस्ती न्यायाचे व्यापक हेतूने मंजूर करण्यात यावी अशी वादीने विनंती केलेली आहे. या दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरुपात, मागणीत आमुलाग्र बदल होत नाही तसेच प्रतिवादींना अनावश्यक नुकसान होत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेलीआहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी हजर होऊन नि. क्र. ६७ वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना अर्जातील कथने मान्य व कबूल नाहीत. वादी यांना मुळात दाव्यातील मिळकतींमध्ये हिस्सा मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता तसेच नाही. वादीने दाखल केलेला वारस अर्ज क्र. ८९/२०१३ हा दिनांक १४.०२.२०१९ रोजी नामंजूर केलेले आहे. तसेच सदर आदेशावर वादीने मे. उच्च न्यायालयात केलेले अपील देखील मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९.०८.२०२३ रोजी फेटाळून लावले आहे. अशा परिस्थितीत वादीचा दावा कायद्यास अनुसरुन

नाही. दाव्यामध्ये वादीने आपला पुरावा पूर्ण केला आहे. त्यामध्ये वादी तसेच साक्षीदारांचे जाबजबाब झालेले आहेत. आता प्रतिवादी यांनी पुरावा देणेवर प्रकरण असताना प्रतिवादींना त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादी यांचा प्रतिवादी क्र.१ यांचे पती तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे वडील कै. नेताजी सुतार यांचेसोबत कसलाही संपर्क नव्हता व नाही. वादी हे सुशिक्षित आहेत असे असताना श्रीमती शांताबाई तुकाराम सुतार या जिवंत असताना मयत असल्याचा उल्लेख वादीने प्रतिवादीला त्रास देण्यासाठी केलेला आहे.

**०४.** पुढे प्रतिवादींनी आपल्या म्हणण्यात असे कथन केले आहे की, वादीने दावा कलम २अ मधील अ.क्र.३ मिळकतीचा हिस्सा कॉलममध्ये १/३ हिस्सा नमूद करण्याची परवानगी मागितली आहे. १/३ हिस्सा कशाचे आधारे मागत आहेत याचे कोणतेही स्पष्टीकरण नाही तसेच अशी दुरुस्ती मागणे हे कायद्याच्या तरतुदीच्या विरोधात आहे. दावा कलम ७ मध्ये ०९.०६.२०१० असे नमूद करणेस वादीने परवानगी मागीतली आहे. प्रतिवादी यांनी पुरावा देणेवर काम नेमले असताना अशी बाब वादींच्या लक्षात येणे यावरुन वादीचा निष्काळजीपणा दिसून येत आहे. सबब. जादाच्या कॉस्टवर अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. वादीने दाव्यामध्ये २ब नंतर २क चा मजकूर समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. वादी क्र.१ हा सज्ञान असून त्याचे शिक्षणे बी.एस्स.सी. केमिस्ट्री तसेच एम.बी.ए. झाले आहे. वादी क्र. १ व २ यांना अनुकंपा तत्त्वाखाली नोकरी मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता व नाही. प्रतिवादी क्र. १,२ व ३ यांचा तो प्रथम हक्क आहे. तो डावलून अनुकंपा तत्त्वाखाली नोकरीचा प्रथम हक्क सांगणे हे पूर्णपणे

बेकायदेशीर आहे. तसेच सी.ए. यांच्या फॉर्मने दिलेल्या दाखल्यावरुन जी काही रक्कम वादी हे प्रतिवादी क्र.१ यांना अदा झाली आहे तसेच सदर रकमेत १/४ हिस्सा वादी क्र.१ यांना मिळण्याचा दावा करत आहेत तो मुळात बेकायदेशीर आहे, त्यामुळे सी.ए. यांच्या फॉर्मने दिलेल्या दाखल्यावरुन अशी दुरुस्ती वादी यांनी मागणी हे प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादी यांना प्रतिवादी क्र.१ यांना मिळालेल्या तसेच मिळकत असलेल्या पेन्शनमध्ये हिस्सा मागणेचा तसेच रक्कम वसून होईपर्यंत द.सा.द.शे० १२% दराने व्याजदर मागणेचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे दुरुस्ती नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे. वादीने दावा कलम १० मध्ये मागितलेली दुरुस्ती ही कायद्यातील तरतुदीस धरुन नाही. वादी यांना पेन्शन रकमेतील हिस्सा मागणेचा कोणताही कायदेशीर अधिकार नसलेने वादी यांनी नमूद केलेल्या रकमेवर स्टॅम्प देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादी यांनी अर्ज कलम ३ मधील मजकूर खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना मान्य व कबूल नाही. प्रतिवादी क्र.१ या कॅन्सरग्रस्त असून त्यांच्यावर औषधोपचारासांसाठी अमाप खर्च झाला आहे व होत आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ हे मिळेल ते कामे करुन उदरनिर्वाह औषधोपचारावरील खर्च करत आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२ यांनी अनुकंपा तत्तवाखाली नोकरी मिळणेसाठी अपार प्रयत्न केले परंतु तांत्रीक कारणामुळे अद्यापपर्यंत त्यांना नोकरी मिळालेली नाही. अशा परिस्थितीत वादीचा पुरावा संपल्यानंतर दुरुस्ती अर्ज दाखल करणे हे न्यायास धरुन नाही. वादी यांना मुळात प्रस्तुत दावा दाखल करणेचा अधिकार नाही व नव्हता. सदर अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींना अनावश्यक असे मानसिक, शारिरिक तसेच आर्थिक नुकसान सोसावे

लागणार आहे. दाव्याच्या स्वरुपात अमुलाग्र बदल होणार आहे. तसेच दावा प्रलंबित राहण्याचा कालावधी अकारण वाढणार आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

**०५.** प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. अभिलेखावरील कागदपत्रे पाहता व वादीने दाखल केलेला दावा हा अचल संपत्तीकरिता व इतर मागण्यांकरिता दाखल केलेला आहे. दाव्यात दुरुस्तीचा अर्जावर निर्णय घेतेवेळी करु पाहत असलेली दुरुस्ती ही आधीच्या कथनांच्या विरोधात नसून दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल करणारी नसणे आवश्यक आहे. तसेच त्या दुरुस्तीद्वारे प्रतिवादीचा कोणताही हक्क हिरावला जात नाही किंवा प्रतिवादीला कोणतेही नुकसान होत नाही हे पाहणे देखील तितकेच गरजेचे आहे. या संदर्भात याक्षणी प्रतिवादी सांगत असल्याप्रमाणे दुरुस्ती मंजूर करतेवेळी ती दुरुस्ती वर सांगितलेल्या निकषांना अनुसरुन आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर असते. प्रस्तुत प्रकरणात मुद्दे काढलेले आहेत तसेच वादीचा पुरावा झालेला आहे व प्रकरण हे प्रतिवादींच्या पुराव्यावर आहे. तसेच वादी करु पाहत असलेली दुरुस्ती शाबीत करण्याची जबाबदारी देखील वादीचीच आहे व प्रकरणात प्रतिवादींचा पुरावा अजून बाकी आहे. तसेच वादीने केलेल्या दुरुस्तीवर म्हणणे देण्याची प्रतिवादींना संधी आहे. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्तीने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर होणेस पात्र ठरतो. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज (नि. क्र. ६४) रक्कम रुपये ७००/- ची कॉस्ट प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती विहीत मुदतीत करावी, तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तद्नंतर तत्काळ सादर कराव्यात.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

VRUSHALI GHADIGAONKAR

Digitally signed by VRUSHALI GHADIGAONKAR
Date: 2026.08.04 16:47:47 +0530

दिनांकः ०४.०८.२०२६ (व्ही.जे. घाडीगांवकर - रावजाडेजा)
सातारा. ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सातारा.